# ग्राहक गा-हाणे निवारण मंच
# महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
# औरंगाबाद परिमंडळ,औरंगाबाद.
## प्रकरण क्र.सीजीआरएफ/एझेड/ शहर / ५८६ /२०१६/ १७
**( नोदंणी क्रमांक २०१६०६००८७ )**

तक्रार दाखल दिनांक :- २२.०६.२०१६
निकाल दिनांक :- ०२.०८.२०१६

श्री. शमशेर खान युसूफ खान, तक्रारदार
घर क्रमांक ५३८, हर्सुलगांव ,
औरंगाबाद ४३१ ००१.
( ग्राहक क्रमांक ४९००११८८९०९१ )

**विरुध्द**

महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी म .शहर मंडळ ,औरंगाबाद गैरअर्जदार

**उपस्थिती**

| | | |
|---|---|---|
| मंच सदस्य | १ ) डॉ.भास्कर पालवे | अध्यक्ष |
| | २ ) श्री. उत्तम.म.उरकुडे | सदस्य / सचिव |
| | ३ ) श्री. वि. सु काबरा | सदस्य |

अपिलार्थी - श्री. शमशेर खान युसुफ खान, रा .औरंगाबाद.
. गैरअर्जदार - श्री. अ.पी.पठाण, कार्यकारी अभियंता, शहर विभाग, औरंगाबाद

# ग्राहक गा-हाणे निवारण मंच -निर्णय

अर्जदार श्री शमशेर खान युसूफ खान , घर नंबर ५३८, हर्सुलगांव , जिल्हा औरंगाबाद ( ग्राहक क्रमांक ४९००११८८९०९१ ) यांनी गैरअर्जदार कार्यकारी अभियंता ( प्रशासन ) ,नोडल ऑफीसर, शहर विभाग , महावितरण औरंगाबाद यांचे विरुध्द महाराष्ट्र विदयुत नियामक आयोग ( ग्राहक गा-हाणे निवारण मंच व लोकपाल ) विनियम २००६ अन्वये सूची अ मध्ये तक्रार दिनांक २२.०६.२०१६ रोजी दाखल केली आहे तक्रारीचा तपशिल थोडक्यात खालीलप्रमाणे आहे.

अवाजवी विज बिल रदद करुन नविन सुधारीत विज बिल देण्यात यावे.

**<u>कार्यकारी अभियंता ( प्रशासन ) शहर विभाग ,महावितरण, औरंगाबाद यांचे म्हणणे</u>**

गैरअर्जदार कार्यकारी अभियंता ( प्रशासन ) शहर विभाग , औरंगाबाद यांनी दिनांक ०२.०८.२०१६ चे पत्रानुसार खालीलप्रमाणे आपले म्हणणे सादर केले आहे.

ग्राहकाने सन २००९ ते २०.०७.२०१५ पर्यन्त एकही विज बिल भरले नाही . ग्राहकाचे सि.पी.एल तपासले असता सदरील ग्राहकाची रिडीग फोटोवर व सि.पी.एल वर माहे नोव्हेंबर २०१४ मध्ये ६६२६ अशी होती. डिसेंबर २०१४ मध्ये ६७१६ अशी होती मात्र पुढील महिन्याच्या रिंडीगप्रमाणे माहे जानेवारी २०१५ मध्ये रिडीग रिव्हर्स झाल्याचे निदर्शनास आले. त्यानंतर ग्राहकाचे मिटर तपासणी केली असता मिटरमध्ये छेडछाड केल्याचे निदर्शनास आले. यावरुन सदरील ठिकाणी विज चोरी असल्याचे निष्पन्न झाले. ग्राहकाने स्वतच्या फायद्यासाठी अप्रामाणिकपणे विदयुत मिटरचे दोन्ही Body Seal हाताळून मिटरच्या अंतर्गत भागात अतिरीक्त Resistance टाकून मिटर Reverse करुन मिटरची गती ८८.२१ टक्के कमी केलेली आढळली.

ग्राहकास विदयुत कायदा २००३ अंतर्गत कलम १३५ नुसार विज चोरीचे रुपये ११०४० चे विज बिल देण्यात आले होते. ते विज चोरीचे बिल रुपये ११०४०/- पावती क्रमांक ७२२४४६ दिनांक २७.०७.२०१६रोजी भरले आहे. तसेच तडजोड रक्कम रु. ४०००/- ग्राहकाने पावती क्रमांक ७२२६३९ व्दारे दिनांक २७.०७.२०१६ रोजी भरले आहे त्यामुळे विज चोरी करीत असल्याचे ग्राहकास मान्य आहे. सबब सदरील प्रकरण मा.ग्राहक गा-हाणे निवारण मंचाच्या अधिकार क्षेत्रात येत नसल्याने निकाली काढण्याची विनंती केली आहे.

**<u>ग्राहक गा-हाणे निवारण मंचाचे निष्कर्ष</u>**

अर्जदार व गैरअर्जदार यांनी वेळोवेळी सुनावणी दरम्यान आपले म्हणणे सादर केलेले आहे. ग्राहकास विदयुत कायदा २००३ अन्वये कलम १३५ नुसार विज चोरीचे रुपये ११०४०/- चे विजबिल देण्यात आले होते तसेच तडजोड बिल रुपये ४०००/- ग्राहकाने अदा केले आहे . त्याचा अर्थ ग्राहकाने विज चोरी मान्य केली आहे. सदर प्रकरण विदयुत कायदा २००३ चे कलम १३५ च्या कक्षेत येते. सदर

पान क्रमांक ३ /-

प्रकरण ग्राहक गा-हाणे निवारण मंच च्या कक्षेत येत नाही. ग्राहकाने विदयुत कायदा २००३ कलम १३५ चे संबधित प्राधिकरणाकडे संपर्क साधणे आवश्यक आहे त्यामुळे खालीलप्रमाणे आदेश परीत करीत आहे .

# आदेश

१ ) सदरचे प्रकरण विदयुत कायदा २००३ चे कलम १३५ अतंर्गत येत असल्याने ग्राहकाचा अर्ज निकाली काढण्यात येत आहे.

२ ) या खटल्यापोटी ग्राहकास कोणतीहि आर्थिक भरपाई देण्यात येणार नाही.

३ ) महावितरणने विदयुत कायदा २००३ चे कलम १३५ नुसार ग्राहकावर कार्यवाही करावी.

४ ) ३० दिवसाचे आत आदेशावर केलेल्या कार्यवाहीचा अनुपालन अहवाल सादर करावा.

| | | |
|---|---|---|
| स्वाक्षरीत | स्वाक्षरीत | स्वाक्षरीत |
| . डॉ.भास्कर गो.पालवे | उत्तम.म.उरकुडे | विलासचंद्र.सु.काबरा |
| अध्यक्ष | सदस्य/सचिव | सदस्य/सचिव |